# शाश्वत ग्रामीण विकासः विशेष संदर्भ - ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या (मुल व मुली) बुद्धिमत्ता, शैक्षणिक अभिवृत्ती व आकांक्षा स्तराचा तुलनात्मक अभ्यास

**डॉ. गुणवंत सोनोने**
दूर शिक्षा निदेशालय, म. गां. अं. हिं. वि., वर्धा (महाराष्ट्र, भारत)

***सारांश (Abstract) :***
*ग्रामीण क्षेत्राचा विकासाचा अनुशेष भरुन काढुन समतोल शाश्वत ग्रामीण विकास साधने आवश्यक आहे. ग्रामीण क्षेत्रातील आर्थिक-सामाजिक दृष्ट्या मागासलेल्या समुदायातील युवकांना करियर विकासाकरिता अतिशय संघर्ष करावा लागतो. ग्रामीण क्षेत्राच्या शाश्वत विकासाकरिता दर्जेदार शिक्षण आवश्यक आहे. विश्व स्तरावर विकसित नव-नविन उचित तंत्रज्ञानाचा उपयोग ग्रामीण क्षेत्राच्या शैक्षणिक विकासाकरिता करणे काळाची गरज आहे, याकरिता 'गोबल टु लोकल' या तत्वाचा उपयोग करता येइल. ग्रामीण समुदायाच्या शाश्वत, समग्र व संतुलित विकासाकरिता कृषी, उद्योग, व्यापार, सेवा, शिक्षण, प्रशासन ई. क्षेत्राकरिता कार्यक्षम नेतृत्व विकसित करण्यात शिक्षणाची भुमिका अत्यंत महत्वपुर्ण आहे. बुद्धिमत्ता, विकासात्मक अभिवृत्ती व उच्च आकांक्षा असलेले नागरिक आपल्या क्षमतांचा सवीत्तम उपयोग करुन ग्रामीण भागातील विविध क्षेत्राचा शाश्वतविकास करु शकतात. विविधांगी क्षमता प्राप्त नागरिक निर्माण करणे ही शिक्षणाची जबाबदारी आहे. ग्रामीण भागातील विविध क्षेत्राच्या शाश्वता विकासात वरील क्षमता असलेल्या नागरिकांची महत्वपुर्ण भुमिका लक्षात घेउन प्रस्तुत संशोधन विषयाची निवड करण्यात आली. प्रस्तुत संशोधनाचे उद्देश १) ग्रामीण भागातील इयत्ता नववीमध्ये अध्ययन करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या (मुले व मुली) बुद्धिमत्तेचा तुलनात्मक अभ्यास करणे. २) ग्रामीण भागातील इयत्ता नववीमध्ये अध्ययन करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या (मुले व मुली) शैक्षणिक अभिवृत्तीचा तुलनात्मक अभ्यास करणे. ३) ग्रामीण भागातील इयत्ता नववीमध्ये अध्ययन करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या (मुले व मुली) आकांक्षा स्तराचा तुलनात्मक अभ्यास करणे., इ. निर्धारित करण्यात आले. प्रस्तुत संशोधन शाळेसी संबंधित असल्याने वर्णनात्मक संशोधन पद्धतीतील शालेय सर्वेक्षण पद्धतीची निवड करण्यात आली. प्रस्तुत संशोधनाकरिता सुगम यादृच्छिक नमुना निवड पद्धतीतील लॉटरी पद्धतीचा उपयोग करुन माध्यमिक शाळेतील इयत्ता नववीमध्ये अध्ययन करणाऱ्या ग्रामीण भागात वास्तव्यास असलेल्या ६०० विद्यार्थ्याची (मुल व मुली) न्यादर्श म्हणून निवड करण्यात आली. प्रस्तुत संशोधनाकरिता जी. सी. आहूजा यांची बुध्दिमत्ता चाचणी, एस. एल. चोप्रा यांची शैक्षणिक अभिवृत्ती मापिका, व्हि. पी. शर्मा व ए. गुप्ता यांची आकांक्षा स्तर चाचणी (इदेस् इ) यांचा उपयोग करुन संकलित माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन करण्याकरिता ‚‘ मूल्य या प्रगत सांख्यिकीय तंत्राचा अवलंब करण्यात आला. त्याआधारे पुढील निष्कर्ष मांडण्यात आले.१) ग्रामीण भागातील मुले आणि मुलींची बुध्दिमत्ता समान दिसून आली. २) ग्रामीण भागातील मुले व मुलींची शैक्षणिक अभिवृत्ती समान दिसून आली. ३) ग्रामीण भागातील मुलांपेक्षा मुलींचा आकांक्षा स्तर उच्च दिसून आला.*

*पारिभाषिक शब्द (Keywords):*
*शाश्वत ग्रामीण विकास, बुध्दिमत्ता, शैक्षणिक अभिवृत्ती, आकांक्षा स्तर.*

**प्रस्तावना (Introduction) :**
प्रत्येक विद्यार्थ्यांच्या संपूर्ण व्यक्तीमत्वाचा विकास करणे हे शिक्षणाचे ध्येय सर्वमान्य झाले आहे. ज्ञान व बुद्धिमत्तेसोबतच विद्यार्थ्यांची निरनिराळया क्षेत्रातील अभिवृत्ती व त्यानुसार आकांक्षा स्तर विकसित व्हावा लागतो. इ. सर्व घटकाचा संतुलित विकास म्हणजे शिक्षण होय. विद्यार्थ्यांची बुद्धिमत्ता, अभिरूची, अभिवृत्ती, आकांक्षा स्तर यांचा साकल्याने विकास होत असतो.

**बुद्धिमत्तेचा अर्थ** -
१९९४ मध्ये बुध्दिमत्तेवर 'ईंग्हैास् एम्गाहम दह घ्यूात्तुहम' मध्ये ५२ संशोधकांनी बुध्दिमत्तेवर विचार करून खालील व्याख्या केली आहे.

'A very general mental capability that, among other things, involves the ability to reason, plan, solve, problems, think abstractly, comprehence complex ideas, learn quickly and learn from experience. It is not morely book learning it reflects a broader & deeper capability for comprehensing our surroundings 'catching on,' 'Making sense' of things, or 'Frguring out' what to do'

-52 Inteligence Researchers in 1994

**अभिवृत्तीचा अर्थ** (Meaning of Attitude) -
"Refers to predisposition to perceive, feel or behave towards specific objects in a particular manner."

-English Dictionary

**आकांक्षा स्तराचा अर्थ (Meaning of Level of Aspiration) -**
"Ambition or an ambition, the pronunciation of an aspirate or the sign marks one."

-Dictionary of English Language

**संशोधन अभ्यासाची प्रासंगीकता (Relevance of the study) :**
बुध्दिमत्ता, अभिरुची असूनही अभिवृत्ती नसेल तर व्यक्ती कृती करण्यास प्रवृत्त होत नाही. कारण अवधान टिकून राहत नाही. बुध्दिमत्ता असेल परंतु अध्ययनाकडे कल नसेल तर शैक्षणिक निष्प्त्तीवर विपरीत परिणाम दिसून येतो. तेंव्हा बुध्दिमत्ते बरोबरच अभिवृत्ती ही विविध क्षेत्रात यश संपादनाकरिता आवश्यक बाब

ठरते. बुध्दिमत्तेला अनुसरुन विद्यार्थ्यांचा आकांक्षा स्तर असणे महत्वाची बाब आहे. पुष्कळदा आपल्याला असे दिसून येते की, निम्न बुध्दिमत्ता असणारे किंवा सरासरी बुध्दिमत्ता असणारे विद्यार्थी उच्च प्रकारच्या आकांक्षा बाळगतात त्यामुळे त्यांचा अपेक्षाभंग होऊन वैफल्य येते. बुध्दिमत्तेनुसार आकांक्षा स्तर ठेवल्यास बुध्दिमत्ता व शैक्षणिक संपादन यात समतोल साधल्या जातो. बुध्दिमत्तेनुसार आकांक्षा स्तर असल्यास विविध क्षेत्रात प्रयत्नाने यश प्राप्त करु शकतो.

विद्यार्थ्यांमध्ये बुध्दिमत्तेला अनुसरुन अभिवृत्ती व आकांक्षा स्तर विकसीत करण्याकरिता आवश्यक सोई-सुविधा, उचित तंत्रज्ञान व पोषक वातावरण इत्यादीचा ग्रामीण भागात अभाव दिसुन येतो. याचा निश्चित परिणाम विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकासावर व पर्यायाने ग्रामीण भागाच्या शाश्वत विकासावर होत असतो.या अनुशंघाने बुध्दिमत्ता, अभिवृत्ती व आकांक्षा स्तराच्या दृष्टिकोनातुन ग्रामीण भागाच्या शाश्वत विकासा संदर्भात संशोधन होने प्रासंगिक आहे.या दृष्टिकोनातुन संशोधनाची गरज आहे व हेच या संशोधनाचे महत्व आहे.

**संशोधनाची उद्दिष्ट्ये (Research Objectives) :**

प्रस्तुत संशोधनासाठी खालील उद्दिष्ट्ये निर्धारित करण्यात आली.

१. ग्रामीण भागातील इयत्ता नववीमध्ये अध्ययन करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या (मुले व मुली) बुद्धिमत्तेचा तुलनात्मक अभ्यास करणे.
२. ग्रामीण भागातील इयत्ता नववीमध्ये अध्ययन करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या (मुले व मुली) शैक्षणिक अभिवृत्तीचा तुलनात्मक अभ्यास करणे.
३. ग्रामीण भागातील इयत्ता नववीमध्ये अध्ययन करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या (मुले व मुली) आकांक्षा स्तराचा तुलनात्मक अभ्यास करणे.

**संशोधनातील चले (Research Veriable) :**

प्रस्तुत संशोधनात खालील चलांचा विचार करण्यात आला.

**अ) स्वाश्रयी चल**: बुध्दिमत्ता, शैक्षणिक अभिवृत्ती व आकांक्षा स्तर.

**आ) आश्रयी चल:** ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचे प्राप्तांक.

**संशोधन परिकल्पना (Research Hypothesis)** :

प्रस्तुत संशोधनातील परिकल्पना पुढीलप्रमाणे -

१. ग्रामीण भागातील इयत्ता नववी मध्ये अध्ययन करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या (मुले व मुली) बुद्धिमत्तेमध्ये सार्थक फरक नसतो.
२. ग्रामीण भागातील इयत्ता नववी मध्ये अध्ययन करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या (मुले व मुली) शैक्षणिक अभिवृत्तीमध्ये सार्थक फरक नसतो.
३. ग्रामीण भागातील इयत्ता नववी मध्ये अध्ययन करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या (मुले व मुली) आकांक्षा स्तरामध्ये सार्थक फरक नसतो.

**साहित्य समिक्षा (Literature review):**

पूर्व संशोधनाचा आढावा घेतल्यास असे दिसून येते की, दिक्षीत, मिथिलेश कुमारी (१९८५)कौमार्यावस्थेतील इयत्ता नववी व अकरावीत अध्ययन करणाऱ्या मुलं आणि मुलींच्या शैक्षणिक संपादन आणि बुध्दिमत्ता यांचा तुलनात्मक अभ्यास,कुमार योगेश, (१९८९) अरूणाचल प्रदेशातील लोहीत जिल्हयातील माध्यमिक स्तरातील आदिवासी व आदिवासीत्तवर विद्यार्थ्यांचे समायोजन, अभिवृत्ती, अभिरूची, आकांक्षा स्तराचा तुलनात्मक अभ्यास, शर्मा, मुक्ता एव मेहता, मंजु (१९८९) मानसिक समायोजनावर निवडलेला अभ्यासक्रम आणि अभिरूची, अभिवृत्तीमधील असंगतीचा परिणाम आजमावणे, जैन, गणेशलाल (१९९०) राजस्थानातील ग्रामीण व शहरी भागातील किशोरवयीन मुलींचे मूल्य, आकांक्षा स्तर, व्यक्तिमत्व गुण यांचा तुलनात्मक अभ्यास, कौर, डी. (१९९०) जम्मु विभागातील शैक्षणिक व व्यावसायीक आकांक्षेचा विविध आर्थिक-सामाजिक स्तराच्या संदर्भात अभ्यास, नायक, बी.पी. (१९९०) ७-११ वर्ष वयोगटातील आदिवासी आणि आदिवासीत्तर बालकांची संपादन प्रेरणा आणि आकांक्षा स्तराचा तुलनात्मक अभ्यास, पारिख, डी. एल. (१९९०) राजस्थानातील केंद्रिय विद्यालय, राज्य शासनाच्याशाळा, खाजगी शाळेतील किशोरवयीन विद्यार्थ्यांची 'स्व' संकल्पना, व्यक्तिमत्वाचे गुण, आकांक्षा स्तर यांचा तुलनात्मक अभ्यास, शर्मा,एल.पी. (१९९०) उच्च माध्यमिक शाळेतील उच्च सर्जनशील आणि निम्न सर्जनशील शारीरिक दृष्टया अपंग विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्व गुण, अभिरूची, आकांक्षा स्तराचा तुलनात्मक अभ्यास, गुप्ता व्ही.एस. व पौल, एस.(१९९९) माध्यमिक शाळेतील शिक्षक प्रशिक्षणार्थ्यांची अध्यापन सरावापूर्वी व नंतरची 'स्व' संकल्पना आणि आकांक्षा स्तराचा तुलनात्मक अभ्यास, कुवेद, आर. रहेमान खान (२००६) दिल्लीतील उच्चमाध्यमिकशाळेतील मुलं आणि मुलींच्या व्यावसायिक आकांक्षेचा तुलनात्मक अभ्यास,इत्यादी विविध विषयावर संशोधन झालेले आहे. परंतु ग्रामीण भागातील इयत्ता नववीमध्ये अध्ययन करणाऱ्या विद्यार्थ्यांची (मुले व मुली) बुध्दिमत्ता, शैक्षणिक अभिवृत्ती व आकांक्षा स्तराचा तुलनात्मक अभ्यास यावर संशोधन न झाल्यामुळे प्रस्तुत विषयाची संशोधनाकरिता निवड करण्यात आली व हेच या संशोधनाचे वैशिष्ट्ये आहे व तेच त्यांचे वेगळेपण आहे.

**संशोधन पद्धती (Research Methodology) :**

प्रस्तुत संशोधन माध्यमिक शाळेतील इयत्ता नववीमध्ये अध्ययन करणाऱ्या ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या बुध्दिमत्ता, शैक्षणिक अभिवृत्ती, आकांक्षा स्तराचा तुलनात्मक अभ्यास असल्यामुळे या विद्यार्थ्यांना बुध्दिमत्ता, शैक्षणिक अभिवृत्ती, आकांक्षा स्तर चाचणी देवून माहिती संकलित करण्यात आली. ग्रामीण भागातील विद्यार्थ्याच्या बुध्दिमत्ता, शैक्षणिक अभिवृत्ती, आकांक्षा स्तराचा तुलनात्मक अभ्यास होणे आवश्यक असून ही समस्या शालेय स्तरावरील असून याबाबत सद्यास्थिती जाणून घ्यावयाची असल्यामुळे शालेय/ विद्यालय सर्वेक्षण पद्धतीचा अवलंब करण्यात आला.

**न्यादर्श -**

प्रस्तुत संशोधनाकरिता सुगम यादृच्छिक न्यादर्श पद्धतीची निवड करण्यात आली आहे. माध्यमिक स्तरावरील निवडलेल्या शाळांमध्ये इयत्ता नववी मध्येअध्ययन करणाऱ्या ग्रामीण शाळेमधील १५ मुले व १५ मुली यांची न्यादर्श म्हणून निवड लॉटरी पद्धतीने करण्यात आली.

प्रस्तुत संशोधनासाठी ग्रामीण भागातून ६०० विद्यार्थ्यांची (मुले व मुली) न्यादर्श म्हणून निवड करण्यात आली.

**सारणी क्र. -१**
**ग्रामीण भागातील एकूण विद्यार्थ्यांचा न्यादर्श दर्शविणारी सारणी**

| क्षेत्र | विद्यार्थी | | एकूण विद्यार्थी |
|---|---|---|---|
| | मुले | मुली | |
| ग्रामीण | ३०० | ३०० | ६०० |

**संशोधनाची साधने (Reseach Tool) -**
प्रस्तुत संशोधनात माहिती संकलनाकरिता जी. सी. आहूजा यांची बुध्दिमत्ता चाचणी, एस. एल. चोप्रा यांची शैक्षणिक अभिवृत्ती मापिका, व्हि. पी. शर्मा व ए. गुप्ता यांची आकांक्षा स्तर चाचणी यांचा उपयोग करण्यात आला.

**माहिती संकलन, विश्लेषण व अर्थनिर्वचन (Data collection, analysis & interpretation) -**
प्रस्तुत संशोधनाकरिता जी. सी. आहूजा यांची बुध्दिमत्ता चाचणी, एस. एल. चोप्रा यांची शैक्षणिक अभिवृत्ती मापिका, व्हि. पी. शर्मा व ए. गुप्ता यांची आकांक्षा स्तर चाचणी (इदेस् इ) यांच्या सहाय्याने माध्यमिक स्तरातील ग्रामीण भागात वास्तव्यास असलेल्या ६०० विद्यार्थ्याद्वारे (मुल व मुली) माहिती संकलित करण्यात आली. संकलित माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन करण्याकरिता मध्यमान, प्रमाण विचलन, 't' मूल्य या प्रगत सांख्यिकीय तंत्राचा अवलंब करण्यात आला.

**सारणी क्र.-२**
**ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या (मुले-मुली) बुध्दिमत्तेची तुलना दर्शविणारी सारणी**

| घट | न्यादर्श | मध्यमान | प्रमाण विचलन | स्वाधीनता मात्रा | प्रमाणत्रुटी | मध्यमानातील फरक | प्राप्त 't'मुल्य | सार्थक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ग्रामीण मुलें | ३०० | ४९.०८ | १६.५४ | | | | | |
| ग्रामीण मुली | ३०० | ४९.८५ | १३.५६ | ५९८ | १.२३ | ०.७७ | ०.६३ | नाही |

संदर्भः वरिल सारणीमध्ये दर्शविण्यात आलेली माहिती ही शालेय सर्वेक्षणाच्या माध्यमातुन विद्यार्थ्यांद्वारे संकलीत करण्यात आली आहे.

वरील सारणी क्र. २ वरून असे निदर्शनास येते की, ग्रामीण भागातील मुलांच्या बुध्दिमत्तेचे मध्यमान ४९.०८ व मुलींच्या बुध्दिमत्तेचे मध्यमान ४९.८५ आहे. मध्यमानातील फरक ०.७७ आहे. ५९८ स्वाधीनता मात्रेकरीता नमुना 't' मूल्य ०.०५ स्तरावर १.९६ अपेक्षित आहे. प्राप्त 't' मूल्य ०.६३ आहे. व ते ०.०५ स्तरावर सार्थक नाही. याचाच अर्थ असा की, ग्रामीण भागातील मुले आणि मुलींच्या बुध्दिमत्तेमध्ये समानता आहे. यावरुन असा निष्कर्ष निघतो की, ग्रामीण भागातील मुले आणि मुलींची बुध्दिमत्ता समान आहे.

**सारणी क्र.-३**
**ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या (मुले-मुली) अभिवृत्तीची तुलना दर्शविणारी सारणी**

| घट | न्यादर्श | मध्यमान | प्रमाण विचलन | स्वाधीनता मात्रा | प्रमाण त्रुटी | मध्यमानातील फरक | प्राप्त 't' मुल्य | सार्थक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ग्रामीण मुलें | ३०० | ८४.२९ | १६.१७ | | | | | |
| ग्रामीण मुली | ३०० | ८६.४० | १२.०२ | ५९८ | १.१६ | २.११ | १.८२ | नाही |


संदर्भः वरिल सारणीमध्ये दर्शविण्यात आलेली माहिती ही शालेय सर्वेक्षणाच्या माध्यमातुन विद्यार्थ्यांद्वारे संकलीत करण्यात आली आहे.

वरील सारणी क्र. ३ वरून असे निदर्शनास येते की, ग्रामीण भागातील मुलांच्या अभिवृत्तीचे मध्यमान ८४.२९ व मुलींच्या अभिवृत्तीचे मध्यमान ८६.४० आहे. मध्यमानातील फरक २.११ आहे. ५९८ स्वाधीनता मात्रेकरीता नमुना 't' मूल्य ०.०५ स्तरावर १.९६ अपेक्षित आहे. प्राप्त 't' मूल्य १.८२ आहे. व ते ०.०५ स्तरावर सार्थक नाही. याचाच अर्थ असा की, ग्रामीण भागातील मुले आणि मुलींच्या शैक्षणिक अभिवृत्तीमध्ये समानता आहे.
यावरुन असा निष्कर्ष निघतो की, ग्रामीण भागातील मुले आणि मुलींची शैक्षणिक अभिवृत्ती समान आहे.

**सारणी क्र.-४**
**ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या (मुले-मुली) आकांक्षा स्तराची तुलना दर्शविणारी सारणी**

| घट | न्यादर्श | मध्यमान | प्रमाण विचलन | स्वाधीनता मात्रा | प्रमाण त्रुटी | मध्यमानातील फरक | प्राप्त't'मुल्य | सार्थक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ग्रामीण मुलें | ३०० | २५.१४ | ४.१९ | | | | | |
| ग्रामीण मुली | ३०० | २६.५६ | ४.६७ | ५९८ | ०.३६ | १.४२ | ३.९४ | आहे |

संदर्भः वरिल सारणीमध्ये दर्शविण्यात आलेली माहिती ही शालेय सर्वेक्षणाच्या माध्यमातुन विद्यार्थ्यांद्वारे संकलीत करण्यात आली आहे.




आलेख क्र.-१

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या (मुले-मुली) आकांक्षा स्तराची तुलना दर्शविणारा आलेख

वरील सारणी क्र. ४ व आलेख क्र.-१ वरून असे निदर्शनास येते की, ग्रामीण भागातील मुलांच्या आकांक्षा स्तराचे मध्यमान २५.१४ व मुलींच्या आकांक्षा स्तराचेमध्यमान २६.५६ आहे. मध्यमानातील फरक १.४२ आहे. ५९८ स्वाधीनता मात्रेकरीता नमुना 't' मूल्य ०.०५ स्तरावर १.९६ अपेक्षित आहे. प्राप्त 't' मूल्य ३.९४ आहे. व ते ०.०५ स्तरावर सार्थक आहे.

याचाच अर्थ असा की, ग्रामीण भागातील मुले आणि मुलींच्या आकांक्षा स्तरामध्ये फरक आहे.

यावरुन असा निष्कर्ष निघतो की, ग्रामीण भागातील मुलांपेक्षा मुलींचा आकांक्षा स्तरअधिक आहे.

**परिकल्पनेचे परिक्षण :**

**परिकल्पना - १**

'ग्रामीण भागातील इयत्ता नववी मध्ये अध्ययन करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या (मुलें व मुली) बुध्दिमत्तेमध्ये सार्थक फरक नसतो.'

वरील सारणी क्र. २ वरून असे निदर्शनास येते की, ग्रामीण भागातील मुलांच्या बुध्दिमत्तेचे मध्यमान ४९.०८ व मुलींच्या बुध्दिमत्तेचे मध्यमान ४९.८५ आहे. मध्यमानातील फरक ०.७७ आहे. ५९८ स्वाधीनता मात्रेकरीता नमुना 't' मूल्य ०.०५ स्तरावर १.९६ अपेक्षित आहे. प्राप्त 't' मूल्य ०.६३ आहे. व ते ०.०५ स्तरावर सार्थक नाही.

याचाच अर्थ असा की, ग्रामीण भागातील मुले आणि मुलींच्या बुध्दिमत्तेमध्ये समानता आहे. म्हणून परिकल्पनेचा स्वीकार करावा लागतो.

**परिकल्पना - २**

'ग्रामीण भागातील इयत्ता नववी मध्ये अध्ययन करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या (मुलें व मुली) अभिवृत्तीमध्ये सार्थक फरक नसतो.'

वरील सारणी क्र. ३ वरून असे निदर्शनास येते की, ग्रामीण भागातील मुलांच्या अभिवृत्तीचे मध्यमान ८४.२९ व मुलींच्या अभिवृत्तीचे मध्यमान ८६.४० आहे. मध्यमानातील फरक २.११ आहे. ५९८ स्वाधीनता मात्रेकरीता नमुना 't' मूल्य ०.०५ स्तरावर १.९६ अपेक्षित आहे. प्राप्त 't' मूल्य १.८२ आहे. व ते ०.०५ स्तरावर सार्थक नाही.

याचाच अर्थ असा की, ग्रामीण भागातील मुले आणि मुलींच्या शैक्षणिक अभिवृत्तीमध्ये समानता आहे. म्हणून परिकल्पनेचा स्वीकार करावा लागतो.

**परिकल्पना - ३**

'ग्रामीण भागातील इयत्ता नववी मध्ये अध्ययन करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या (मुलें व मुली) आकांक्षा स्तरामध्ये सार्थक फरक नसतो.'

वरील सारणी क्र. ४ व आलेख क्र.-१ वरून असे निदर्शनास येते की, ग्रामीण भागातील मुलांच्या आकांक्षा स्तराचे मध्यमान २५.१४ व मुलींच्या आकांक्षा स्तराचे मध्यमान २६.५६ आहे. मध्यमानातील फरक १.४२ आहे. ५९८ स्वाधीनता मात्रेकरीता नमुना 't' मूल्य ०.०५ स्तरावर १.९६ अपेक्षित आहे. प्राप्त 't' मूल्य ३.९४ आहे. व ते ०.०५ स्तरावर सार्थक आहे.

याचाच अर्थ असा की, ग्रामीण भागातील मुले आणि मुलींच्या आकांक्षा स्तरामध्ये फरक आहे. म्हणून परिकल्पनेचा त्याग करावा लागतो.

**निष्कर्ष आणि चर्चा (Results and discussion) :**

'ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांची (मुले आणि मुलीं) ची बुध्दिमत्ता, शैक्षणिक अभिवृत्ती व आकांक्षा स्तराचा तुलनात्मक अभ्यास', या विषयावरील प्रस्तुत संशोधन विषयाचे निष्कर्ष मांडत असतांना माध्यमिक शाळेतील इयत्ता नववीच्या विद्यार्थ्यांकडून जी. सी. आहूजा यांची बुध्दिमत्ता चाचणी, एस. एल. चोप्रा यांची शैक्षणिक अभिवृत्ती मापिका, व्हि. पी. शर्मा व ए. गुप्ता यांची आकांक्षा स्तर चाचणी (Form P) सोडवून घेण्यात आली. संकलित माहितीच्या विश्लेषण व अर्थनिर्वचनावरून पुढील निष्कर्ष मांडण्यात आलेले आहे.

१. ग्रामीण भागातील मुले आणि मुलींची बुध्दिमत्ता समान दिसून आली. (सारणी क्र.२) Shan, J. H. (१९९०) यांच्या 'अर्धशहरी किंवा ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या बुध्दिमत्तेच्या विचलनामध्ये लिंगभेदानुसार फरक दिसून आला नाही.'' या निष्कर्षाशी मिळताजुळता आहे.
२. ग्रामीण भागातील मुले आणि मुलींची शैक्षणिक अभिवृत्ती दिसून आली. (सारणी क्र.३)
३. ग्रामीण भागातील मुलांपेक्षा (मध्यमान २५.१४) ग्रामीण भागातील मुलींची (मध्यमान २६.५६) आकांक्षा स्तर अधिक दिसून आला. (सारणी क्र.४) Gupta V. S. and Paul S. (१९९९) यांच्या ग्रामीण मुलांपेक्षा मुलींचा आकांक्षा स्तर चांगला होता.'' या निष्कर्षाशी मिळताजुळता आहे.

ग्रामीण भागातील मुले व मुलींची बुध्दिमत्ता व शैक्षणिक अभिवृत्ती समान दिसून आली. तर ग्रामीण भागातील मुलांपेक्षा ग्रामीण भागातील मुलींचा आकांक्षा स्तर अधिक दिसून आला. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकासाकरिता बुद्धिमत्ता, शैक्षणिक अभिरुत्ती व आकांक्षा स्तराचा योग्य विकास होने आवश्यक आहे. याकरिता आवश्यकता आहे ती, त्यांना विविध क्षेत्रात विकास करण्याची संधी मिळण्याची त्यांना आवश्यक

सोई-सुविधा, उचित तंत्रज्ञान व पोषक वातावरण उपलब्ध करून दिल्यास ते निश्चितच प्रगती करतील आणि यशस्वी होतील. अशा विविध क्षेत्रातील यशस्वी ग्रामीण युवकांचा (मुले व मुली) उपयोग शाश्वत ग्रामीण विकासाकरिता निश्चित करून घेता येईल.

**संशोधनाच्या मर्यादा आणि भविष्यातील दिशानिर्देश (Limitations and Future Research Directions) :**

प्रस्तुत संशोधन अमरावती व यवतमाळ जिल्ह्यातील ग्रामीण भागातील मराठी माध्यमांच्या माध्यमिक शाळेतील इयत्ता नववी मध्ये अध्ययन करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या (मुले व मुली) बुध्दिमत्ता, शैक्षणिक अभिवृत्ती व आकांक्षा स्तराचा तुलनात्मक अभ्यास करण्यापुरतेच मर्यादित होते. प्रस्तुत संशोधनाला काही मर्यादा पडलेल्या आहेत याची जाणीव संशोधकाला आहे. प्रस्तुत संशोधन हे मर्यादित कालावधीत करावयाचे असल्यामुळे तथ्य संकलनाकरिता निवडलेला न्यादर्शही मर्यादित स्वरूपाचा आहे. पुढील विषयावर भविष्यात संशोधन आवश्यक आहे.

१. राज्य स्तरावर असे संशोधन आवश्यक आहे.
२. प्राथमिक, कनिष्ठ महाविद्यालय, वरिष्ठ महाविद्यालयीन स्तरावर असे संशोधन आवश्यक आहे.
३. विविध प्रवर्ग व संवर्गानुसार सहसंबंधात्मक/तुलनात्मक अभ्यास आवश्यक आहे.
४. शिक्षक-प्रशिक्षका संदर्भात संशोधन आवश्यक आहे.
५. विविधविकास क्षेत्राचे तुलनात्मक/ सहसंबंधात्मक संशोधन आवश्यक आहे.
६. विविध व्यावसायिक अभ्याक्रमात अध्ययन करणाऱ्या मुला-मुलींची बुध्दिमत्ता, शैक्षणिक अभिवृत्ती व आकांक्षा स्तर यावर संशोधन आवश्यक आहे.

***संदर्भ ग्रंथ (References) :***

***मराठी -***

*१. आगलावे, प्रदिप (२०००). संशोधन पध्दती, शास्त्र व तंत्र. नागपुर विद्या प्रकाशन.*
*२. करंदीकर, सुरेश (२००५). शैक्षणिक मानसशास्त्र. कोल्हापूर, फडके प्रकाशन.*
*३. कुंडले, म. बा. (२००३). शैक्षणिक तत्वज्ञान व शैक्षणिक समाजशास्त्र. पुणे, विद्या प्रकाशन.*
*४. कऱ्हाडे, बि. एम.(२००७). शास्त्रिय संशोधन पध्दती. नागपुर, पिंपळापुरे प्रकाशन.*
*५. कार्डीले, वसंतराव आणि महाले, संजीवनी (२००२). संशोधनात सांख्यिकीय तंत्राचे उपयोजन. नाशिक, य. च.म. मु. विद्यापीठ.*
*६. घाटोळ, रा.ना. (२००३). समाजशास्त्रीय संशोधन तत्वे व पध्दती. नागपुर, मंगेश प्रकाशन.*
*७. घोरमोडे, के.यु. आणि घोरमोडे, कला (२००८). शैक्षणिक संशोधनाची मुलतत्वे. नागपुर, विद्या प्रकाशन.*
*८. जोशी, अनंत आणि महाले, संजीवनी (२००६). मुक्त विद्यापीठीय संशोधन: संशोधन मार्गदर्शक मालीका-पुष्प पहिले. नाशिक, य. च.म. मु. विद्यापीठ.*
*९. दांडेकर, वा. ना. (२०००). शैक्षणिक व प्रायोगिक मानसशास्त्र. पुणे, विद्या प्रकाशन.*
*१०. देशपांडे, लीना (२००७). मुक्त विद्यापीठीय संशोधन, संशोधन मार्गदर्शक मालीका-पुष्प चौथे. नाशिक, य.च.म.मु.विद्यापीठ.*
*११. पोखरापुरकर, राजा (२००७). संशोधनासाठी नमुना निवड, संशोधन मार्गदर्शन मालीका- पुष्प ११ वे. नाशिक, य. च.म. मु. विद्यापीठ.*
*१२. बिहारी, पंडीत बन्सी (१९९७). शिक्षणातील संशोधन (संकल्पनात्मक परिचय). पुणे, नूतन प्रकाशन*
*१३. भिंताडे, वि. रा. (१९८९). शैक्षणिक संशोधन पध्दती. पुणे, नूतन प्रकाशन.*
*१४. भिताडे, वि. रा. (२००५). शैक्षणिक संशोधन पध्दती. पुणे, नूतन प्रकाशन.*
*१५. भाडांरकर, के. एम. (१९९८). सुलभ शैक्षणिक संख्याशास्त्र. पुणे, नूतन प्रकाशन.*
*१६. मुळे, रा. श. आणि उमाठे, वि. तु. (१९९८). शैक्षणिक संशोधनाची मूलतत्वे. नागपुर, महाराष्ट्र ग्रंथ निर्मिती मंडळ*
*१७. सोहनी, शं. कृ. (१९९३). शैक्षणिक टीपाकोश. पुणे, हिंदुस्थान मुद्रणालय.*

***हिंदी -***

*१. पाण्डये, गणेश (२००४). सामाजिक मनोविज्ञान. नई दिल्ली, राधा पब्लिकेशन्स.*
*२. पाण्ड्ये , के. पी. (२००६). शैक्षिक अनुसंधान. वाराणशी, विश्वविद्यालय प्रकाशन.*
*३. मंगल, एस. के. एवं मंगल, शुभ्रा (२००३). शिक्षण एवं अधिगम का मनोविज्ञान. मेरठ, इन्टरनेशल पब्लिशिंग हाऊस.*
*४. रॉय, पारसनाथ एवं भटनागर, चाँद (१९७७). अनुसंधान परिचय. आगरा, शिक्षा-संबंधी प्रकाशक.*
*५. शर्मा, आर. ए. (२००४). शिक्षा अनुसंधान. मेरठ, सुर्या पब्लिकेशन.*
*६. शर्मा, बी. एल. एवं सक्सेना, आर. एन. (२००४). युजिसी शिक्षाशास्त्र. मेरठ, सुर्या पब्लिकेशन.*

***English:***

1. *Aggrawal, J. G. (1996). Educational Research an Introduction. New Dehli, Arya book depot.*
2. *Ahuja, G. C. (1971). Manual for Group test of intelligence. Agra, National pasychological corporation.*
3. *Best, J. W., & Khan, J. B. (2000). Research in Education. Prentice Hall of India, pvt. Ltd.*
4. *Best, John W. and Khan, James V. (2004). Research in education. (7th Ed) New Delhi; Prentice Hall of India pvt. Ltd.*
5. *Best, J. W. and khan, J. V. (2006). Research in Education. Prentice Hall of India, Pvt. Ltd.*

6. *Blommers, P. B. and Lindquist, E. F. (1960). Elementary Statistical methods. Calcatta, Oxford Book co.*
7. *Buch, M. B. (1982-1988). Forth survery of Research in Education, Vol. No. 1. New Delhi, Published by N.C.E.R.T.*
8. *Chopra, S. L. (1971). Manual for the attitude scale of toward Education. Agra, National Psychological Corporation.*
9. *Dandpani, S. (2003). Advance Educational Psychology. New Delhi, anmol publications Pvt.Ltd.*
10. *Dandapani, S. (2003). A Text Book of Advanced Educational Psychology. New Delhi, Anmol Publication, Pvt. Ltd.*
11. *Edwin, Locke A. and Luthan G.P. (1990). A Theory of Goal setting and Test Performance. New Jersy, Prentice Hall Englewood Cliffs.*
12. *ENCARTA (1999). The New Lexlcon Websters Dictionary of English Lagnuage.New York, Lexicom public.INC.*
13. *Khan, M. Sharrif (1990). Educational Research. Delhi, Ashis Publication House.*
14. *Kothari, C. R. (1993). Research Methodology- Methods & Techniques. New Delhi, Wiley Eastern Ltd.*
15. *Kumar, Yogesh (1989). A Comparative study of adjustment, attitude, interest's and level of aspirations of the tribal and non-tribal student's of the secondary level of the of Lohit district in Arunachal Pradesh. Forth survey of Research in Education (1982-1988), Vol. No. 1, New Delhi, Published by N.C.E.R.T.*
16. *Saksena, N. R., Sharma, B. K. and Mohanthy, R. K. (2003). Fundamental of Educational Research. Meerut, Surya Publication, six Survey of Research in Education", 1993-2000, Vol. I., Published by N.C.E.R.T., New Delhi.*
17. *Shah, M.A. and Bhrgava, M.A. (1987). Manual for the level of Aspiration. Agra, National Psychological Corporation.*
18. *Sharma, V. P. and Gupta, Anurag (1971). Manual for EducationalAspiration Scale (EAS -form p). Agra, National Psychological Corporation.*
19. *Sharma, Mukta and Mehta, Manju (1989). Psychological adjustment; Effect of discordance between interest, aptitude and chosen curriculum. Indian Educational Review Vol.24 (2): 45-54.*
20. *Sharma, L. P. (1990). A Comparative study of the personality traits, interests and aspirations of high-creative and low-creative physically handicapped students of higher secondary school. Forth survey of Research in Education (1982-1988), Vol. No. 1, New Delhi, Published by N.C.E.R.T.*
21. *Wilknson and Bhandarkar (2003). Methodology and technique of Social Researcsh. Himalaya Publishing house.*

***Website:***

1. *http://en.wikipedia.org/wiki/Intelligence (trait)*
2. *http://www.Jmi.nic.in/Research/ab2007-iase-Khuwaid.pdf*